पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे - ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३३३३३
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाइट - www.pcmcindia.gov.in

क्र. वैद्य/०९/कावि/५०७/२०२२ दि. ०१.०२.२०२२

विषय : कोरोना विषाणू (कोविड १९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "Break The Chain" प्रतिबंधात्मक आदेश.

संदर्भ : १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय, मुंबई, क्रमांक कोरोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य - ५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.महसूल व वन विभाग (DMU/2020/CR.92/DISM,1) दि. १७.०४.२०२०, २१.०४.२०२०, २९.०६.२०२०, ६.०७.२०२०, ३१.०७.२०२०, ३१.०८.२०२०, ३०.०९.२०२०, १४.१०.२०२०, २९.१०.२०२०, ०३.११.२०२०, १४.११.२०२०, २३.११.२०२०, २७.११.२०२०, २१.१२.२०२०, २४.१२.२०२०, २९.१२.२०२०, १४.०१.२०२१, १०.०२.२०२१, १५.०३.२०२१, २७.०३.२०२१, ०४.०४.२०२१, १३.०४.२०२१, २०.०४.२०२१, २१.०४.२०२१, २९.०४.२०२१, १२.०५.२०२१, ३०.०५.२०२१, ०४.०६.२०२१, २५.०६.२०२१, २७.११.२०२१, २४.१२.२०२१, ३०.१२. २०२१, ०८.०१.२०२२, ३१.०१.२०२२

५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन,आदेश क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५, दि. ०२.०८.२०२१, ११.०८.२०२१, १६.०८.२०२१, २४.०९.२०२१, २६.१०.२०२१

६) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेश जा. क्र. वैद्य/०९/कावि/१२९६/२०२१ दि. १४.०४.२०२१, क्र. १३१७, दि. १७.०४.२०२१ ,क्र. १३२१, दि. २०.०४.२०२१, क्र. १३६९ दि. २२.०४.२०२१, क्र. १५५८ दि. ३०.०४.२०२१, क्र. १६११ दि. १३.०५.२०२१, क्र. १६८६ दि. १९.०५.२०२१, क्र. २०४४ दि. २९.०५.२०२१, क्र. २०४६ दि. ३१.०५.२०२१, क्र. २४०३ दि. ०५.०६.२०२१, क्र. २५१२ दि. ११.०६.२०२१, क्र. २६२६ दि. १९.०६.२०२१, क्र. २६६५ दि.२६.०६.२०२१, क्र. २७८८ दि. ०३.०७.२०२१, क्र. २९२३ दि. ११.०७.२०२१, क्र. ३०१६ दि. १७.०७.२०२१, क्र. ४०४० दि. ०१.०८.२०२१, क्र. ४१६० दि. ०८.०८.२०२१, क्र. ४२१९ दि. १४.०८.२०२१, क्र. ४५११ दि. ०९.०९.२०२१, क्र. ४६१४ दि. १७.०९.२०२१, क्र. ४६२० दि. २१.०९.२०२१, क्र. ४७३५ दि. २७.०९.२०२१, क्र. ४८२६ दि. ०५.१०.२०२१, क्र. ४८४४ दि. ०५.१०.२०२१, क्र. ४८७१ दि. ०९.१०.२०२१, क्र. ६१४७ दि. ३०.११.२०२१, क्र. ६३२४ दि. १५.१२.२०२१, क्र. ६४५५ दि. २३.१२.२०२१, क्र. ६४५६ दि. २५.१२.२०२१, क्र. ६४८१ दि.३१.१२.२०२१, क्र. २६ दि. ०४.०१.२०२२, क्र. ४४ दि. ०९.०१.२०२२, क्र. ४५ दि.१०.०१.२०२२ क्र. ४२७ दि. २४.०१.२०२२, क्र. ४७२ दि. २९.०१.२०२२

**आदेश,**

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ०४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड - १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, जगभरात कोरोना विषाणूचा नवा प्रकार ' ओमायक्रॉन (Omicron) ' आढळून आला असून व जागतिक आरोग्य संघटना (W.H.O.) ने सदर विषाणू प्रकारास Variant Of Concern म्हणून जाहीर केले आहे.

सदर विषाणूचा संसर्ग मोठया प्रमाणात होऊ नये यास्तव या विषाणू विरोधी प्रतिबंधात्मक उपाय योजना व आवश्यक ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड - १९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड - १९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **राजेश पाटील, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका** खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय उद्याने तसेच सर्व पर्यटनस्थळे त्यांच्या नियोजित वेळेत सुरु राहतील.

२) वरील नमूद ठिकाणी येणा-या सर्व नागरिकांचे लसीकरण (दोन मात्रा) पूर्ण झालेले असणे आवश्यक राहील. मास्कचा वापर, सामाजिक अंतर (Social Distancing), सॅनिटायझेशन याबाबतच्या नियमांचे (Covid Appropriate Behaviour) तसेच मा. महाराष्ट्र शासन व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोविड - १९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे व गर्दी नियंत्रित करणेची जबाबदारी संबंधित आस्थापनांची राहील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/१९८२ पिंपरी-४११०१८

३) स्पा, सलून, ब्युटी पार्लर आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. सदर ठिकाणी काम करणारे कर्मचा-यांचे लसीकरण (दोन मात्रा) पूर्ण झालेले असणे आवश्यक राहील.

४) अंत्यविधी तसेच अंत्यसंस्कारासाठी उपस्थित नागरिकांच्या संख्येस कोणतेही प्रकारचे निर्बंध नसतील.

५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व उद्याने सकाळी ०६.०० ते ०९.०० व सायंकाळी ०५.०० ते ०८.०० या वेळेत सुरु राहतील.

६) मनोरंजन पार्क, थिम पार्क (Theme Park), जलतरण तलाव, वॉटर पार्क ५०% क्षमतेने सुरु राहतील.

७) रेस्टॉरंट, हॉटेल्स, सिनेमागृह व नाट्यगृह आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील.

८) सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम हॉल / मंडपाच्या आसन क्षमतेचा ५०% क्षमतेने सुरु राहतील.

९) विवाह सोहळा संपूर्ण खुल्या असलेल्या (open to sky) जागांच्या बाबतीत तेथील जागेच्या क्षमतेच्या २५% लोकांना व बंदिस्त / बंद जागेत घेण्यात येणारा समारंभ २०० लोकांना यापैकी जे कमी असेल अशा सदस्य संख्येत साजरा करणेस परवानगी राहील.

१०) खेळांशी निगडीत सर्व स्पर्धा (घोड्यांच्या शर्यतीसह) स्टेडियम आसन क्षमतेच्या २५% क्षमतेने सुरु राहतील.

११) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आठवडे बाजार सर्व दिवस सुरु राहतील.

१२) वरील नमूद बाबीं व्यतिरिक्त इतर बाबींसाठी दि. ०९.०१.२०२२ व दि. १०.०१.२०२२ रोजीचे आदेश लागू राहतील.

१३) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड १९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दि. ०२.०२.२०२२ पासून पुढील आदेशापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. ०१.०२.२०२२ रोजी दिलेला आहे.

01/02/22

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/१९८२ पिंपरी-४११०१८

**(राजेश पाटील)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**प्रत माहितीस्तव सादर -**

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे.
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवड.
४) सर्व क्षेत्रिय अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.